# T16/AGR212/EE/20160309

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उपप्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजीपाल्याची काढणी करतांना कोणती काळजी घ्यावी ? 5

ब) भाजीपाल्याची नासाडी टाळल्यामुळे कोणकोणते फायदे होतात. 5

क) भाजीपाल्याच्या पॅकिंगचे महत्त्व स्पष्ट करा. 5

ड) पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या आदर्श साहित्याचे गुणधर्म स्पष्ट करा. 5

इ) भाजीपाल्याची शुन्य ऊर्जा तत्त्वावर आधारित शीतकक्षातील साठवण संदर्भात सविस्तर माहिती लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) टोमॅटोची काढणी कशी आणि कोणकोणत्या अवस्थेत करतात याबद्दल थोडक्यात माहिती लिहा. 5

ब) कलिंगडाची फळे काढणीसाठी तयार झाली आहेत ते कसे ओळखावे ? 5

क) बटाटा काढणीच्या पद्धतीची थोडक्यात माहिती लिहा. 5

ड) नवलकोलची काढणी व हाताळणी कशी करावी याबद्दल थोडक्यात स्पष्ट करा. 5

इ) भेंडीची काढणी, हाताळणी आणि शीतगृहातील साठवण कशी करतात याबद्दल थोडक्यात लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भाजीपाला वाहतुकीच्या निरनिराळ्या प्रकारांची यादी लिहा व त्यांचे गुणदोष थोडक्यात लिहा. 5

ब) भाजीपाल्याची स्थानिक विक्रीव्यवस्थेविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

क) भारतातुन भाजीपाला निर्यातीस असणारा वाव स्पष्ट करा. 5

ड) आपल्या देशातील प्रक्रिया उद्योगाची सद्यस्थिती स्पष्ट करा. 5

इ) राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या योजनांची यादी लिहा व यातील कोणत्याही एक योजनेची सविस्तर माहिती लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) साठवण व हाताळणीच्या दरम्यान भाजीपाल्याची होणाऱ्या नासाडीची कारणे स्पष्ट करा. 5

ब) ''एक्झॉस्टिंग'' म्हणजे काय ? एक्झॉस्टिंगमुळे कोणते फायदे होतात ? 5

क) भाज्यांपासून तयार केलेली लोणची खराब होणाऱ्या कारणांची यादी व त्यावरील उपाययोजना थोडक्यात स्पष्ट करा. 5

ड) भाजीपाला सुकविण्याच्या पद्धतींची यादी लिहा. सौर ऊर्जेवर भाजीपाला सुकविण्याच्या पद्धतीविषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

इ) आळींबीपासून तयार करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांची यादी देवून आळींबी सुकविण्याची कृति थोडक्यात लिहा. 5